| | |
|---|---|
| **दाखल तारीख** | १२.०४.२०२४ |
| **नोंदणी तारीख** | १२.०४.२०२४ |
| **न्यायनिर्णय ता.** | ०४.०७.२०२६ |
| **कालावधी** | वर्षे. महिने. दिवस<br>०२ ०२ २२ |

**निशाणी क्र.१८/ब**

**भाग अ**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, चांदूर बाजार,**
**जि. अमरावती यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी एच.एस. सोनार.)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६३५/२०२४**

**ब्राम्हणवाडा थडी पो. स्टे. गुन्हा रजिस्टर क्र. १०७/२०२४**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>द्वारा पोलिस स्टेशन ठाणेदार,<br>पोलिस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी,<br>ता. चांदुरबाजार, जि. अमरावती. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री. यु.आर.वसुले, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **गिता शामु बारस्कर,**<br>वय – ४५ वर्षे धंदा – मजुरी,<br>रा. गौरखेडा,ता. चांदुरबाजार, जि. अमरावती |
| **प्रतिनिधीत्व** | विधिज्ञ श्री.व्ही.एच.शिरसाठ. |

## आरोपींचा तपशील

| आरोपींचे नाव | अटकेची दिनांक | जामीनावर सोडल्याची दिनांक | ठेवलेले आरोप | निर्दोष / दोषी | दिलेली शिक्षा | संपरीक्षा चालू असतांना आरोपींना स्थानबध्द करुन ठेवल्याचा कालावधी – फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|
| **गिता शामु बारस्कर** | ०७.०३. २०२४ | ०७.०३. २०२४ | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ड) अन्वये | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. | काही नाही. | लागु नाही. |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | ०७.०३.२०२४ |
| खबर/फिर्याद नोंदणीची दिनांक | ०७.०३.२०२४ |
| दोषारोपपत्राची दिनांक | १२.०४.२०२४ |
| आरोपाचा तपशील निश्चीत करण्याची दिनांक | १७.०१.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याची दिनांक | ११.०९.२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्यात आल्याची दिनांक | ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची दिनांक | ०४.०७.२०२६ |
| शिक्षा ठोठावण्याचा आदेशाची दिनांक/ जर काही | काही नाही. |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक : ०४.०७.२०२६)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ड) अन्वये अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता संपरिक्षा चालविण्यात आलेली आहे.

**२.** अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०७.०३.२०२४ रोजी फिर्यादी ए.एस.आय. साहेबराव राजस हे पोलिस कर्मचाऱ्यांसह गस्तीवर असताना त्यांना आरोपी गीता बारस्कर ही गाव गौरखेडा, ब्राम्हणवाडा थडी येथे अवैधरित्या हातभट्टीची १७ लीटर गावठी दारू बाळगताना मिळुन आली. सदर मुद्देमाल त्यांनी पंचांसमक्ष जप्त करून त्यातुन १८० मी.ली. नमुना वेगळा काढला व उर्वरित माल हा जागीच नष्ट केला. तदनंतर, प्रस्तुत प्रकरणाची लेखी फिर्याद पोलिस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी येथे त्याच दिवशी नोंदविली.

३. सदर रिपोर्टच्या आधारे पोलीस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी येथे अपराध क्र १०७/२०२४ नुसार महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ड) अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली. फिर्यादी सहा.पो.उप.निरिक्षक साहेबराव राजस यांनीच प्रस्तुत गुन्हयाचा तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासिन अधिकाऱ्यांनी नि.क्र.८ अन्वये आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ड) अन्वये दंडनिय अपराधाचा तपशील नोंदविला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द मिळून आलेल्या पुराव्याचे स्पष्टीकरण देण्याकरिता तिचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) अन्वये नि.क्र.१७ नुसार निवेदन नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्याने त्याचेविरुध्द खोटा गुन्हा नोंदविल्याचे नमूद केले.

५. माझ्या विचारार्थ निघालेले विचाराधीन प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे :

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपी ही दि.०७.०३.२०२४ रोजी तिचेकडे अवैधरित्या गावठी हातभट्टी १७ लीटर दारू बाळगुन होती, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **.....नाही.** |
| २. | काय आदेश? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अभियोग पक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले असून त्यांची माहिती भाग क मध्ये नमूद करण्यात आली आहे. अभियोग पक्षाने सदर साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यावर आणि त्यांचेद्वारे सिध्द करण्यात आलेल्या कागदोपत्री पुराव्याचे आधारे आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप सिध्द केल्याचा दावा केला आहे. सदर पुराव्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ व २ करिता</u> :-**

७. सा.क्र.१ तपासी अधिकारी साहेबराव राजस हे त्यांचे सरतपासात सांगतात की, त्यांनी दि.०७.०३.२०२५ रोजी आरोपीविरूध्द अवैधरित्या हातभट्टीची १७ ली. गावठी दारू बाळगल्या प्रकरणी फिर्याद (नि.क्र.१०/सा.क्र.१) नोंदविली होती. त्या अनुषंगाने गुन्हयाची नोंद (नि.क्र.११/सा.क्र.१) करण्यात आली होती. सदर घटनास्थळी त्यांनी तात्काळ दोन पंचांसमक्ष १७ ली. गावठी दारू जप्त करून पंचनामा (नि.क्र.१२/सा.क्र.१) तयार केला. जप्त मुद्देमालापैकी काढलेला नमुना दि. १४.०३.२०२४ रोजी रासायनिक परिक्षणाकरिता अमरावती प्रयोगशाळेत ना.पो.कॉ. अंकुश पायघम याचे सोबत पत्र (नि.क्र.१३/सा.क्र.१) देउन पाठविला होता.

८. अभियोग पक्षाने सा.क्र.२ प्रकाश केशवराव ठाकरे यास घटनास्थळ पंच म्हणुन तपासले. तथापि, सदर पंच हे अभियोग पक्षास सहाय्यक साक्ष न देता त्यांची केवळ घटनास्थळ पंचनाम्यावरील सही ओळखतात.

९. रासायनिक प्रयोगशाळेचा अभिप्राय अभिलेखावर दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार, त्यांचेकडे रवाना मुद्देमालात १६.१०% एथिल अल्कोहोल पाण्यात मिळुन आले.

१०. प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्र घटनास्थळ पंच हे अभियोग पक्षास सहाय्य करत नाहीत. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती सिध्द होत नाही. तसेच, कथित अवैध दारू ही दि.०७.०३.२०२४ रोजी जप्त करण्यात आली असुन नि.क्र.१३ वरील पत्रान्वये सदर मुद्देमाल हा दि.१४.०३.२०२४ रोजी पाठविण्यात आला असे अभियोग पक्षाचे पुराव्यावरून दिसुन येते. सदर विलंबाचे कारण देण्यास तपासी अधिकारी अपयशी ठरतात. त्याचसोबत घटनास्थळ पंच अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे रासायनिक प्रयोगशाळा, अमरावती येथे पाठविण्यात आलेला मुद्देमाल हा आरोपीकडुन जप्त केलेला होता अगर कसे याबाबत साशंकता निर्माण होते. सदर साशंकतेचा फायदा आरोपीस देणे अनिवार्य आणि फौजदारी न्यायशास्त्रास अभिप्रेत आहे. सबब, **विचाराधीन प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी** नोंदविण्यात येत आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणात कथित दारू ही यापुर्वीच नष्ट करण्यात आली आहे असे अभियोग पक्षाचे कथन आहे. त्यामुळे, सदर मुद्देमालाबाबत अधिक आदेश करणे आवश्यक नाही. सबब, विचाराधीन प्रश्न क्र. २ चे उत्तर देण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित

करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी नामे **गीता श्यामु बारस्कर** हीची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ड) नुसार गुन्हा केल्याच्या आरोपांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २५५ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेसाठी बंधपत्र व जामीन दयावा व त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) नुसार आजपासुन सहा महिन्यानंतर रद्द समजण्यात यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

**सही/-**
**(एच.एस.सोनार)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्या.क्र.२), चांदुर बाजार.

**दिनांक :** ०४/०७/२०२६

## भाग क

अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नावे | तपशील |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | साहेबराव मंगलाजी राजस | फिर्यादी/तपासी अधिकारी |
| सा.क्र.०२ | प्रकाश केशवराव ठाकरे | घटनास्थळ पंच |

ब) बचावाचे साक्षीदार – नाही.
क) न्यायालयीन साक्षीदार – नाही.

अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन निशाणी
अ) अभियोग पक्ष न्यायालयीन निशाणी–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.क्र. १०/सा.क्र. १ | लेखी फिर्याद |
| २. | नि.क्र. ११/सा.क्र. १ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | नि.क्र. १२/सा.क्र. १ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | नि.क्र. १३/सा.क्र. १ | रासायनिक प्रयोगशाळेस दिलेले पत्र |
| ५. | नि.क्र. १४/सा.क्र. १ | ड्युटी पास |

ब) बचावपक्ष निशाणी – निशाणी काही नाही.
क) न्यायालयातर्फे निशाणी – काही नाही.
ड) सामग्री वस्तु – काही नाही.

सही/–

(एच.एस.सोनार)

दिनांक : ०४/०७/२०२६

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्या.क्र.३), चांदुर बाजार.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Uday Uttam Mugal |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Chandur Bazar. |
| Date of Dictation | 04/07/2026 |
| Judgment/order signed by the PO on | 04/07/2026 |
| Judgment/order uploaded on | 04/07/2026 |